RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ६, अंक ७५(८)] शुक्रवार, सप्टेंबर १२, २०१४/भाद्र २१, शके १९३६ [पृष्ठे ३ किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २२३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १२ सप्टेंबर २०१४

### अधिसूचना

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.

क्रमांक गौखनि.४२/०८०९/प्र. क्र.२७५/ख.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याचे पोट-कलम (१) आणि कलम ३२८ चा खंड (एकोणीस) तसेच कलम ३२९ चे पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढून नेणे) नियम, १९६८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे, त्या अधिसूचनेचा खालील मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे व अशी सूचना देण्यात येत आहे की, मसुदा **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिवसापासून ३० दिवस किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना उपरोक्त कालावधीत उप सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडून प्राप्त होतील त्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### अधिसूचनेचा मसुदा

क्रमांक गौखनि.४२/०८०९/प्र. क्र. २७५/ख.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. अधिनियम ४१) याचे पोट-कलम (१) आणि कलम ३२८ चा खंड (एकोणीस) तसेच कलम ३२९ चे पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढून नेणे) नियम, १९६८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत असून, हे नियम उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, पूर्व प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढून नेणे) (द्वितीय सुधारणा) नियम, २०१४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढून नेणे) नियम, १९६८ मध्ये पुढीलप्रमाणे नियम ४अ समाविष्ट करण्यात येईल :—

" ४. (अ) **दगड उत्खनन.**—जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी किंवा तहसीलदार यांच्या लेखी पूर्व परवानगीने व कोणतीही फी किंवा स्वामित्वधन न देता, पारंपारिक स्वरूपात हाताने दगडफोडीचा व्यवसाय करीत असलेल्या वडार समाजातील कुटुंबांस त्याच्या व्यवसायाच्या प्रयोजनासाठी कलम २२ अन्वये अभिहस्तांकित न केलेल्या आकारणी न केलेल्या कोणत्याही खाजगी जमिनीतून किंवा सरकारी पडीक जमिनीतून वर्षाला २०० ब्रास पर्यंतच्या मर्यादेत दगड काढता येईल. खाणी व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) अन्वये करण्यात आलेले नियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले कायदे यांनुसार २०० ब्रास पेक्षा अधिक दगडाच्या उत्खननावर स्वामित्वधन आकारण्यात येईल. वरील लाभ मिळवण्यासाठी पिढीजात वडार समाजातील व्यक्तींना तसे असल्याचे ओळखपत्र तहसीलदार यांच्याकडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " वडार कुटुंब " या शब्दप्रयोगाचा अर्थ पारंपारिक स्वरूपात हाताने दगडफोडीचा व्यवसाय करीत असलेल्या वडार समाजामधील पती, पत्नी व १८ वर्षांखालील अज्ञान मुले असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा. आ. गुट्टे
शासनाचे उप सचिव.

क्र/खनि/गौणखनिज/०१/२०१४
जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी दि. २९/०१/२०१४

प्रति,
उपविभागीय अधिकारी कुडाळ/सावंतवाडी/कणकवली
तहसिलदार (सर्व)

उपरोक्त महाराष्ट्र शासन राजपत्राची प्रत यासोबत सादर करीत आहे. तरी शासन राजपत्राप्रमाणे आवश्यक कार्यवाही आपले स्तरावरुन करण्यात यावी.

जिल्हाधिकारी
सिंधुदुर्ग

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032

dated the 9th September 2014

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Gaukhani.42/0809/C.R.275/Kh.—The following draft of the rules further to amend the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rules, 1968, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clause (*xix*) of sub-section (2) of section 328 read with section 329 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enabling it in this behalf, is hereby published, as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after the expiry of thirty days from the date on which the draft Notification is published in the *Maharashtra Government Gazette*.

2. Any objections or suggestions which may be received by the Deputy Secretary to the Government of Maharashtra, Revenue Department, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft, within the aforesaid period, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

No. Gaukhani.42/0809/C.R. 275/Kh.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clause (*xix*) of sub-section (2) of section 328 read with sub-section (2) of section 329 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enable it in that behalf, the Government of Maharashtra heteby makes the following rules further to amend the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rules, 1968, the same having been previously published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, namely :–

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) (Second Amendment) Rules, 2014.

2. In the Maharashtra Land Revenue (Extraction and Removal of Minor Minerals) Rules, 1968, after rule 4, the following rule shall be added, namely :—

"4A. *Excavations of Stone*.—With the Previous permission in writing of the Collector, Additional Collector, Sub-Divisional Officer or Tahsildar and without payment of any fee or royalty, family of Vadar for the purpose of his traditional profession of stone crush by hand, remove stone upto 200 brass annually, from any private land or unassessed Government waste land not assigned for special purposes under section 22 of the Code. The royalty shall be payable for excavation over 200 brass of stone as per the rules made under the Mines and Minerals (Regulation and Development) Act, 1957(67 of 1957) or any other law for the time being in force. For getting the above benefits, person belonging to the Community of Vadar doing his traditional profession of stone crush by hand, shall obtain the identity card from the Tahsildar.

*Explanation*.–For the purpose of this rule, the expression "family of Vadar" means the husband, wife and children below the age of eighten years of age of a person belonging to the community of Vadar doing traditional profession of stone crush by hand.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. A. GUTTE,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.